**जलयुक्त शिवार अभियान अतंर्गत कंत्राटदारावर दंडात्मक कारवाई करण्याचे अधिकार जिल्हास्तरीय समितीस प्रदान करण्याबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**जलसंधारण विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांकः जशिअ- २०१७/ प्र.क्र. ४८२ /जल-७**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख : ०७ नोव्हेंबर, २०१७

**परिपत्रक**

**प्रस्तावना :**

सर्वांसाठी पाणी टंचाईमुक्त महाराष्ट्र - २०१९ या अतंर्गत टंचाई परिस्थितीवर कायमस्वरुपी मात करण्यासाठी राज्यात सन २०१५-१६ या वर्षापासून जलयुक्त शिवार अभियान हा अत्यंत महत्वाकांक्षी कार्यक्रम राबविण्यात येत असून, या कार्यक्रमातंर्गत राज्यामध्ये दर वर्षी किमान ५००० गावांची निवड टंचाईमुक्त करण्याकरीता करण्यात येत आहे. या कार्यक्रमातंर्गत ५ वर्षात राज्यातील २५००० गावे टंचाईमुक्त करण्याचे धोरण शासनाने निश्चित केलेले आहे.

या कार्यक्रमातंर्गत निवडण्यात आलेल्या गावांतील कृती आराखडयानुसार प्रस्तावीत कामे मर्यादित कालावधीत ( पावसाळा सुरु असताना व त्यानंतर नाल्यामधील पाणी ओसरेपर्यंत कामे करता येत नसल्याने ) पुर्ण करणे आवश्यक असते. या अभियाना संदर्भात अमलबंजावणीबाबत निर्णय घेणे गावांची / कामांची निवड करणे , गाव कृती आराखडा तयार करणे, त्यांस मान्यता देणे, कार्यक्रमाची अमलबंजावणी करणे व अभियानाचे संनियंत्रण व समन्वय करणे इत्यादी कामांसह अभियानाची जबाबदारी जिल्हाधिकारी यांचेवर सुपूर्द करण्यात आलेली आहे. या करीता जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समिती गठीत करण्यात आलेली आहे.

या अभियानातंर्गत होणारी कामे ही सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये नोंदणीकृत असलेल्या कंत्राटदारांमार्फत करण्यात येतात. अभियानातंर्गत करण्यात येत असलेल्या कामांमध्ये कंत्राटदारांने कसूर केल्यास, काम निकृष्ट दर्जाचे केल्यास किंवा काम सुरु न केल्यास अशा कंत्राटदारावर दंडात्मक कारवाई करावयाची असल्यास याबाबतचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागास पाठविण्यात येतो. मात्र या कार्यपध्दतीमुळे कालपव्यय होतो आणि यामुळे अभियानतंर्गत करावयाची कामे ही तातडीने व मुदतीत पुर्ण करणे शक्य होत नाही. सबब जलयुक्त शिवार अभियानतंर्गत करण्यात येणाऱ्या कामांमध्ये कंत्राटरादारने निविदा करारातील / निविदा सुचनेतील अटी व शर्तीचे पालन न केल्यास, कामात कसूर केल्यास, काम निकृष्ट दर्जाचे केल्यास अथवा मुदतीत काम सुरु न केल्यास अशा कंत्राटदारावर शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम क्र. संकीर्ण /०५ /०६/ प्र.क्र.५३ ईमा -२/ दिनांक २८.९.२००६ नुसार दंडात्मक कारवाई करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीस देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**परिपत्रक :**

जलयुक्त शिवार अभियानतंर्गत करण्यात येणाऱ्या कामांमध्ये कंत्राटदाराने निविदा करारातील/ निविदा सुचनेतील अटी व शर्तीचे पालन न केल्यास, कामात कसूर केल्यास, काम निकृष्ट दर्जाचे केल्यास अथवा मुदतीत काम सुरु न केल्यास अशा कंत्राटदारावर शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम क्र.संकीर्ण /०५ /०६/ प्र.क्र.५३ ईमा -२/ दिनांक २८.९.२००६ नुसार दंडात्मक कारवाई करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीस देण्यात येत आहेत.

सदर शासन परिपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सहमतीने त्या विभागाचा अनौपचारीक संदर्भ क्र. ३९१७ / साबां / दिनांक १३.१०.२०१७ नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१७११०७१४२०३६४४२६ असा आहे. हे शासन परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Eknath Rajaram Dawale

Digitally signed by Eknath Rajaram Dawale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Development And Water Conservation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=499dd4df91587ffef1e20a2ee9e560dd0777e49ff6cfc838f362fdbb58c58e7b, cn=Eknath Rajaram Dawale
Date: 2017.11.07 14:09:45 +05'30'

**(एकनाथ डवले)**
सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव.
२. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव.
३. मा.मंत्री (जलसंधारण) यांचे खाजगी सचिव.
४. मा.राज्यमंत्री (जलसंधारण) यांचे खाजगी सचिव.
५. सर्व मा.मंत्री/ मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
६. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे स्वीय सहाय्यक,
७. अपर मुख्य सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
९. अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग ( मदत व पुनर्वसन ), मंत्रालय, मुंबई.
१०.मा. विरोधी पक्ष नेता, विधान परिषद व विधान सभा, विधानभवन, मुंबई.
११.विभागीय आयुक्त (सर्व)
१२.संचालक ( मृदसंधारण ), कृषि आयुक्तालय, पुणे-४११ ००१

१३.मुख्य अभियंता, लघुसिंचन ( जलसंधारण ), पुणे.
१४.प्रधान मुख्य वनसंरक्षक व महासंचालक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१५.संचालक, महाराष्ट्र सुदूर सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे.
१६.संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे.
१७.मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे.
१८. अपर मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे.
१९.महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मुंबई (प्रसिध्दीकरीता).
२०.सर्वजिल्हाधिकारी,
२१.सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी
२२.महालेखापाल ½, महाराष्ट्र राज्य , मुंबई/ नागपूर (लेखा परीक्षा व लेखा व अनुज्ञेयता).
२३.अधिकदान व लेखा अधिकारी, मुंबई.
२४.निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई.
२५.अधिक्षक अभियंता, लघु पाटबंधारे (स्था. स्तर), पुणे नाशिक, औरंगाबाद, अमरावती
२६.उपायुक्त (विकास) विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे, नाशिक औरंगाबाद,अमरावती
२७.विभागीय कृषि सहसंचालक, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर
२८.जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (सर्व)
२९.कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे (स्था.स्त.) सर्व
३०.वरिष्ठ भूवैज्ञानिक भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, सर्व
३१.जिल्हा कोषागार अधिकारी,
पुणे/सातारा/सांगली/सोलापूर/ कोल्हापूर/ नाशिक/ अहमदनगर / धुळे / जळगांव/ औरंगाबाद/ नांदेड / उस्मानाबाद / बीड / लातूर / जालना / हिंगोली / परभणी / अमरावती / बुलढाणा/ यवतमाळ / अकोला/ नागपूर/ वर्धा / भंडारा/ गोंदिया / चंद्रपूर
३२.सर्व मंत्रालयीन विभाग,
३३.सर्व उप सचिव/अवर सचिव/कार्यासन अधिकारी, ग्रा.वि. व ज.सं विभाग, मंत्रालय, मुंबई
३४.नियोजन विभाग/ वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
३५.कार्यासन जल-११, जल-३, जल-४ ग्रा. वि. व ज. सं. विभाग मंत्रालय, मुंबई.
३६.जल-७, निवड नस्ती.